जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४९५ दिनांक - ०६/०७/२०२३**

## युनिट-५,गुन्हे शाखा,पुणे शहर

# दरोडयाच्या तयारीत असलेल्या टोळीस केले जेरबंद

मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी पुणे शहरात शरीराविरूध्दचे व मालमत्तेविरूध्दचे गुन्हयास प्रतिबंध व्हावा आणि कायदा व सुव्यवस्था राखणेकरीता हद्दीत प्रतिबंधक पेट्रोलिंगचे आयोजन करुन कोम्बींग ऑपरेशनचे आयोजन करणेकामी सुचना दिलेल्या आहेत.

त्याप्रमाणे दि.०५/०७/२०२३ रोजी गुन्हे शाखा,युनिट-५,कडुन युनिट कार्यक्षेत्रात कोम्बींग ऑपरेशनचे आयोजन केले होते. सदर कोम्बींग ऑपरेशन दरम्यान युनिट-५ कडील पथकाला बातमी मिळाली की, माळवाडी रोड तुपे सभागृहजवळ,मोकळया जागेत ६ इसम बसले असुन ते सोनार गल्ली हडपसर,पुणे येथील सोन्याचे दुकान बंद होत असताना दुकानात घुसुन,तेथील लोकांना शस्त्राचा धाक दाखवुन,दुकानातील सोन्या-चांदीचे दागिने,रोख व इतर ऐवज लुटणार आहे अशी बातमी मिळाली.

सदर बातमीप्रमाणे युनिटकडील अधिकारी व अंमलदार यांनी छापा टाकला,त्यादरम्यान नमुद इसमांपैकी काही इसमांना पोलीसांची चाहुल लागल्याने अंधाराचा फायदा घेऊन पळुन गेले व ०३ इसमांना ताब्यात घेतले. त्यांची नावे **१)गणेश बबन लोंढे,वय २३ वर्षे,रा.तरवडे वस्ती,महमंदवाडी,पुणे २)निरंजन दिपक ननवरे,वय १९ वर्षे,रा.वंडीशेगाव,शेळके चौक,पंढरपुर,जि.सोलापुर,३)माऊली बंडु लोंढे,वय २१ वर्षे,रा.पांढरे मळा,हडपसर, पुणे** असे असल्याचे सांगितले.त्यावेळी त्यांची अंगझडती घेता त्यांचे ताब्यातुन १०,८४०/- रुपये किचा मुद्देमाल त्यामध्ये दोन कोयते,एक स्क्रु-ड्रायव्हर,लाल मिरची पावडर,नायलॉनची दोरी असे घातक शस्त्रे व साधने जप्त करण्यात आलेली आहे.त्याचेकडे सदरबाबत विचारणा करता,सदर इसम हे त्यांचे साथीदारासह सोनार गल्लीतील सोन्याचे दुकान बंद होताना तेथे घुसून चोरी करणार होते वगैरे सांगितले.तसेच त्यांचे ताब्यात मिळालेल्या मुद्देमालापैकी मोबाईल फोन हडपसर पोलीस ठाणेकडील चोरीच्या गुन्हयातील असल्याचे निष्पन्न झाल आहे.सदर बाबत त्यांचेविरुध्द हडपसर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं.९७७/२०२३,भा.दं.वि.कलम ३९९,४०२ व भा.ह.का.कलम ४(२५),महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३)१३५ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन अधिक तपास पोलीस करीत आहे.

**वर नमुद ताब्यातील आरोपीतांचा पुर्वइतिहास पाहता त्यांचेवर वेगवेगळया पोलिस स्टेशनला १५ गुन्हे दाखल आहे**

सदरची कारवाई ही मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर, श्री.संदीप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप-आयुक्त,गुन्हे,पुणे,श्री.अमोल झेंडे, मा.सहायक पोलीस आयुक्त,हडपसर,पुणे श्री.सतिश गोवेकर,यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक,उल्हास कदम,पोलीस उप-निरीक्षक,अविनाश लोहोटे,पोलीस अमंलदार,शहाजी काळे,विनोद शिवले,शशिकांत नाळे,अकबर शेख,राहुल ढमढेरे,अमित कांबळे यांचे पथकाने केली आहे.